**प्रेसनोट दिनांक ०८/०६/२०१९**

**समर्थ पोलीस ठाणे पुणे**

**समर्थ पोलीस स्टेशन कडून दोन गावठी पिस्टल व चार जिवंत काडतुसे हस्तगत व दोन सराईतांना केली अटक**

समर्थ पोलीस स्टेशनचे तपासपथकातील स्टाफला दिनांक ७/६/२०१९ रोजी खबर मिळाली की , सोमवार पेठ भागातील गुन्हेगार नामे - रोहन उर्फ दुध्या सुभाष चव्हाण रा. वय – ३६ रा. २०७ सोमवार पेठ पुणे हा दोन पिस्टल आणि काडतुसे विक्री करणेसाठी दारुवाला पूल , सोमवार पेठ पुणे येथे येणार आहे . खबरीचे अनुषंगाने पोलीस उप निरीक्षक प्रभाकर कापुरे , समर्थ पोलीस स्टेशन , पुणे शहर , पोलीस उप निरीक्षक नितीन अतकरे , पोहवा .सुशिल लोणकर, पों.हवा. संतोष काळे , पोशि.अनिल शिंदे , पोशि. अजय शितोळे , बाळासाहेब भांगले, निलेश साबळे , सचिन पवार , शाम सुर्यवंशी , स्वप्नील वाघोले पोशि. ८२०३ सचिन पवार यांनी दारुवाला पूल सोमवार पेठ पुणे येथे सापळा लावला होता. मिळालेले बातमीचे अनुसार दुध्या उर्फ रोहन सुभाष चव्हाण हा दारुवाला पूल जवळ आला. त्याला भेटण्यासाठी आणखी एक इसम तेथे आला . दुध्या हा दुस-या इसमास माल हस्तांतर करीत असताना वरील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी धाडसाने आरोपींजवळ असलेले पिस्टलची भिती न बाळगता त्यांचेवर झडप टाकून शिताफीने त्यांना पकडले. दुध्या समवेत पकडलेले दुस-या इसमाचे नांव - मुनाफ रियाज पठाण वय – २३ रा. ३०० डोके तालीम , नानापेठ पुणे असे असल्याचे त्याने सांगितले.

पकडण्यात आलेले इसमांची झडती घेतली असता त्यांचेकडे प्रत्येकी रु.५०४००/- किंमतीचे एक गावठी बनावटीचे पिस्टल व दोन जिवंत काडतुसे असे एकूण दोन गावठी पिस्टल व चार जिवंत काडतुसे असा एकूण रु. १,००,८००/- चा माल मिळून आला तो पोउपनि. प्रभाकर कापुरे यांनी जप्त करुन ताब्यात घेतला आहे. या कारवाईचे अनुषंगाने उक्त नमूद दोन आरोपींविरोधात पोहवा. सुशिल लोणकर, समर्थ पोस्टे यांनी सरकारतर्फे भारतीय हत्यार कायदा कलम ३ सह २५ व कलम ७ सह २५ व मपोॲ.क. ३७(१) सह १३५ प्रमाणे फिर्याद नोंद करुन समर्थ पोस्टे गुन्हा रजि. नं. १८४/२०१९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येऊन त्या दोन्ही गुन्हेगारांना पोलीसांनी अटक केलेली आहे.

सदरची कामगिरी ही समर्थ पोलीसांनी मा. श्री. मंगेश शिंदे , अपर पोलीस आयुक्त ,पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे , मा. श्री. सुहास बावचे , पोलीस उप आयुक्त , परिमंडळ - १ , मा. श्री. प्रदीप आफळे सहायक पोलीस आयुक्त , फरासखाना विभाग पुणे , श्री. बाळकृष्ण कदम वरिष्ठ पोलीस निरीक्षक , समर्थ पोलीस ठाणे पुणे श्री. विनायक साळुंखे, पोलीस निरीक्षक , गुन्हे , समर्थ पोलीस ठाणे पुणे यांचे मार्गदर्शनाखाली वरील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेली आहे.

गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक , प्रभाकर कापुरे , समर्थ पोलीस ठाणे पुणे हे स्वतः करीत आहेत.



महाराष्ट्र पोलीस